महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३४३ वा | दिनांक : २७/११/२०२५ | वार : गुरूवार

## अजित पवारांचा राजीनामा घ्या, नाही तर दिल्ली गाठणार- अंजली दमानिया यांचा सरकारला अल्टिमेटम



**मुंबई :** पुण्यातील वादग्रस्त जमिनीच्या व्यवहारावरून राज्याच्या राजकारणात मोठा गदारोळ निर्माण झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी थेट पत्रकार परिषद घेऊन या व्यवहारातील तथाकथित गैरव्यवहार उघड केला. दमानिया यांनी सांगितलेल्या तपशीलानुसार, पुण्यातील ४० एकर सरकारी जमिनीसंदर्भात अमेडिया कंपनीने डेटा सेंटर सुरू करणार असल्याचे खोटे दाखवून फक्त ५०० रुपयांत स्टॅम्प ड्युटी माफी मिळवली, असा आरोप त्यांनी केला. त्यावरून त्यांनी अजित पवार यांचा राजीनामा घेण्याची मागणी केली आहे.

अंजली दमानिया यांनी ठामपणे सांगितले की, अमेडिया कंपनीकडून सबमिट केलेल्या लीज डीड आणि कागदपत्रांमध्ये डेटा मायनिंग, आयटी सेवा व सायबर सुरक्षा प्रकल्प उभारण्याचा उल्लेख आहे. यामध्ये ९८ लाखांची गुंतवणूक असल्याचेही नमूद करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात हा व्यवहार जमीन विकत घेण्यासाठीचा असल्याचा संशय आहे. बाजारमूल्य शेकडो कोटी असलेल्या जमिनीवर फक्त ५०० रुपयांत व्यवहार करण्याचे कट कारस्थान असल्याचा आरोप त्यांनी केला. एवढे मोठे प्रकरण जिल्हाधिकाऱ्यांनी पुण्याचे पालकमंत्री असलेल्या अजित पवारांना न सांगता झाले, हे कसे? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

दमानिया यांनी यानुसार, केंद्र सरकारने या प्रकरणात १६ जूनलाच जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून त्वरित हस्तक्षेप करण्याचे आदेश दिले होते. मात्र स्थानिक प्रशासनाने या निर्देशांकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे संपूर्ण प्रकरणात राजकीय दबाव आणि संरक्षण मिळाले, असा त्यांचा दावा आहे. जमीन व्यवहाराची किंमत सुमारे १८०० कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. एवढ्या मोठ्या गैरव्यवहारात संबंधित मंत्र्यांची अनभिज्ञता पटत नाही, असेही दमानिया म्हणाल्या.

या मुद्द्यावरून अंजली दमानिया यांनी राज्य सरकारला चव्हाट्यावर आणले आहे. त्यांनी सांगितले की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात तातडीने कारवाई करावी आणि अजित पवारांचा उपमुख्यमंत्री व पालकमंत्री पदाचा राजीनामा त्वरित घ्यावा. राजीनामा घेतला नाही तर मी सर्व पुरावे घेऊन अमित शहा यांची भेट घेईन, असा थेट इशारा दमानिया यांनी दिला. तसेच या प्रकरणात नेमलेल्या एसआयटीवरही अविश्वास व्यक्त करून, त्या समितीला बरखास्त करण्याची मागणी त्यांनी पुढे केली. तपास पथकात जिल्ह्याचे अधिकारी मोठ्या प्रमाणात असणे हा तपासावर परिणाम करू शकतो, असे त्या म्हणाल्या.

## महापालिकांच्या मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम जाहीर

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्व राजकीय पक्षांचे आणि जनतेचे लक्ष लागले असतानाच, राज्य निवडणूक आयोगाने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील 29 महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी (२०२५) मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमात बदल करण्यात आला असून, सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. यानुसार आता प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना नोंदवण्यासाठी 3 डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व महानगरपालिका आयुक्तांना पत्र पाठवून मतदार यादीचा नवीन कार्यक्रम कळवला आहे. यापूर्वी २७ नोव्हेंबर ही हरकती घेण्याची अंतिम तारीख होती, ती आता वाढवण्यात आली आहे. सुधारित वेळापत्रकानुसार कार्यक्रम खालीलप्रमाणे असेल:

**हरकती व सूचना :** प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत आता ३ डिसेंबर २०२५ पर्यंत असेल. (पूर्वीची तारीख: २७ नोव्हेंबर).

**अंतिम मतदार यादी :** हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रमाणित करून प्रसिद्ध करण्याची तारीख आता 10 डिसेंबर २०२५ निश्चित करण्यात आली आहे. (पूर्वीची तारीख: ५ डिसेंबर).

**मतदान केंद्रे :** मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाईल. (पूर्वीची तारीख: ८ डिसेंबर).

**केंद्रनिहाय यादी :** मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीख २२ डिसेंबर २०२५ असेल. (पूर्वीची तारीख: १२ डिसेंबर).

मतदार यादी तयार करताना प्रशासकीय पातळीवर कोणत्याही तांत्रिक अडचणी येऊ नयेत, यासाठी आयोगाने खबरदारी घेतली आहे. काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास ई-मेलद्वारे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, अत्यंत महत्त्वाच्या कारणासाठी आयोगाच्या संगणकीकरण कक्षाचे अधिकारी समीर गंदपवार यांच्याशी (०२२-२२८८६९५० / २२०१२२९० ) संपर्क साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

गेल्या काही वर्षांपासून राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. मात्र, निवडणूक आयोगाच्या या पत्रामुळे प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. आयोगाच्या mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हा संपूर्ण कार्यक्रम उपलब्ध करून देण्यात आला आहे.

नागरिकांना आपली नावे तपासण्यासाठी आणि काही दुरुस्ती असल्यास ती करण्यासाठी ही वाढीव मुदत महत्त्वाची ठरणार आहे. १० डिसेंबरला अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होईल, असे मानले जात आहे. या सुधारित कार्यक्रमामुळे प्रशासकीय यंत्रणेवरील ताण काहीसा हलका झाला असला तरी, कामाचा वेग वाढवण्याचे आव्हान अधिकाऱ्यांसमोर असणार आहे.




## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ नोव्हेंबर २०२५


## भारतीय संविधानाच्या उद्देशिकेतील ज्ञानदायक व सदभिरुचीपूर्ण प्रत्येक शब्दाचा अर्थबोध

ज्ञानदायक व सदभिरुचीपूर्ण भारताचे संविधान हा सर्वांच्याच कल्याणाचा दस्ताएवज प्रकल्प आहे. हा प्रकल्प सर्वांना समसमान भारतीय नागरिक मानतो. कोणाला परके मानीत नाही. सर्वांनाच आपले मानतो.

संविधान नागरिकांमधली विविधता मानते पण या विविधतेला विषमता मानीत नाही. संविधानाच्या संपूर्ण संरचनेत परका असा शब्दच नाही. संविधान ही परस्परसद्भावावर आधारलेली कुटुंबरचना आहे. सामंजस्य हा या कुटुंबाचा पाया आहे. शोषणरहित, विषमतारहित, लिंगभेदरहित, वर्गरहित, जातीरहित अशी या राष्ट्रकुटुंबाची मांडणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली आहे. संविधानाच्या काळजावर भारतातील प्रत्येक स्त्रीपुरुषाचे नाव लिहिले आहे. दलित,मागासवर्गीय, आदिवासी, भटकेविमुक्त, ओबीसी, मराठा, ब्राह्मण, मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध अशा सर्वच लोकसमूहातील सर्वच माणसांची नावे संविधानाच्या काळजावर छापलेली आहेत. संविधान प्रत्येकच भारतीयाचे आहे. प्रत्येकच भारतीय माणसाला संविधान स्वातंत्र्याची, समतेची, बंधुतेची आणि निर्भयतेची हमी देते. प्रत्येक नागरिकाला समान मानवी सन्मान देण्यासाठीच संविधान जन्माला आले आहे. इथल्या सामान्य माणसाला आपल्या संविधानाने देशाचे अधिनायक होण्याचा मार्ग तत्त्वतः तयार करून दिला आहे असे बाबासाहेबांनी लिहून ठेवले. केवळ प्रजा होते त्यांच्या हातात देशाची सूत्रे जावीत आणि लोकशाही खऱ्या आहे. याचा अर्थ सर्वसामान्य लोक देशाचे सत्ताधारी व्हावेत, जे इतिहासभर अर्थाने लोकशाही ठरावी वा प्रजातंत्र खऱ्या अर्थाने प्रजातंत्र ठरावे. हे डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न होते.

ते त्यांनी साविधानाच्या उद्देशिकेतून सार रूपांनी दिलेले आहे. आपले संविधान राज्यपद्धती नव्हे, तर जीवन पद्धती होय.

१. आम्ही - स्वातंत्र्यापुर्वी आपण एकत्र नव्हतो. विखुरलेले होतो. संविधानाने "मी" ला "आम्ही" केले.

२. भारताचे लोक - विविध वतने, राजांची स्वतंत्र राज्ये, वेगवेगळे व आपापले भूभागाचे लोक एकमेकांना एकाच देशाचे समजत नसत. यांना संविधानाने एका देशाचे /भारताचे नागरिक/लोक म्हंटलेआहे.

३. सार्वभौम - आपण आपल्या देशात आपल्याला योग्य वाटतील असे निर्णय घेण्यास स्वतंत्र आहोत.

४. समाजवादी - आमच्या देशात गरिब आणि श्रीमंत यांच्यात मोठी दरी असणार नाही. देशाच्या संपत्तीवर सर्वांचा हक्क असेल. संपत्तीचे काही मोजक्या लोकांच्या हाती केंद्रीकरण होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

५. धर्मनिरपेक्ष - विविध धर्मांचे लोक असणारा देश चालवताना मात्र शासनातील व्यक्तींना काम करताना कोणताही धर्म असता कामा नये. कोणत्याही एकाच धर्माला राज्याचा धर्म मानला जाणार नाही. धर्म हा व्यक्तिपुरता असावा. तो रस्त्यावर आणु नये.

६. लोकशाही गणराज्य — लोकांकडून / मतदानाद्वारे निवडलेला प्रतिनिधी या राष्ट्राचे काम पाहील. लोकांच्या मतालाच प्रचंड किंमत असेल. लोक ठरवतील त्यांचीच टीम लोकांचे भले करणारे काम करण्यासाठी निवडली जाईल.

७. घडवण्याचा - वरीलप्रमाणे असणारा असा देश निर्माण करण्याचा

८. सामाजिक न्याय - व्यक्तींमध्ये जात, धर्म, वंश, भाषा, प्रदेश, जन्मस्थान किंवा लिंग यावर आधारित कोणताही भेदभाव केला जाणार नाही माणूस म्हणून सर्वांचा दर्जा सारखाच असेल. अस्पृश्यतेसारखी, बिहिष्कृत करण्यासारखी परिस्थिती निर्माण न होऊ देणारा. म्हणजेच सामाजिक न्याय होय.

९. आर्थिक न्याय - कोणाही एकाच प्रकारच्या कामासाठी समान वेतन, मुल्ये दिले जाईल. देशातील प्रत्येकाला कोणत्याही भेदभावाशिवाय आपल्या आवडीप्रमाणे उपजीविकेचे साधन मिळवण्याचा हक्क नागरिकांना असेल.

१०. राजनैतिक न्याय - लोकशाही प्रक्रियेत महिला, पुरुष व अन्यलिंगीय व्यक्तींना व प्रत्येक घटकास निवडणूक प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवता येईल व त्याला त्याचे मत देण्याचा व निवडणूक लढविण्याचा अधिकार असणारा.

११. विचार स्वातंत्र्य - देशाच्या नागरिकास स्वतंत्रपणे विचार करण्याचे स्वातंत्र्य असेल. त्यावर कोणाचाही अंकुश असणार नाही.

१२. अभिव्यक्ती स्वातंत्र्य - प्रत्येकास आपला विचार मांडण्याची मुभा असेल. विचार मांडताना व्यक्तिद्वेषी विचार नसतील तर त्यावर कोणाचेही बंधन नसेल. लिहिणे, बोलणे, सादर करणे याचे स्वातंत्र्य असेल.

१३. विश्वास स्वातंत्र्य - प्रत्येकास आपण मानत असलेल्या मूल्यानुसार विश्वास ठेवण्याचे स्वातंत्र्य असेल. त्यावर कोणाचे बंधन नसेल.

१४. श्रध्दा व उपासना स्वातंत्र्य - प्रत्येक व्यक्ती कोणत्याही धर्मावर श्रध्दा ठेऊ शकतो व व त्यानुसार उपासना करू शकते. धर्मांतर करणे, धर्म स्वीकारणे वा नाकारण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीस असणार आहे.

१५. दर्जाची समानता - प्रत्येकास समान वागणूक दिली जाईल याची खात्री. त्याचा अपमान होणार नाही अशी व्यवस्था. कोणासही आपला दर्जा उंचावण्याचा अधिकार असेल. आर्थिक सामाजिक व इतर प्रकारचा दर्जा उंचावताना त्या व्यक्तीस कोणीही आडकाठी करणार नाही.

१६. संधीची समानता - प्रत्येक नागरिकास समान संधी व समान काम मिळेल याचे नियोजन असेल. कोणत्याही कारणाने कोणास संधीच उपलब्ध होणार नाही अशी स्थिती राहणार नाही. लोकांना आपली प्रगती साधता येईल.

१७. व्यक्तीची प्रतिष्ठा - नागरिकांना आपली प्रतिष्ठा अबाधित ठेवता येईल असे वातावरण निर्माण केले जाईल. कोणाच्याही प्रतिष्ठेस ठेच लागणार नाही याची आपण काळजी घेऊयात.

१८. राष्ट्राची एकता - राज्य, भाषा, वेश तसेच राज्यांचे सीमावाद सामंज्यसाने निकाली काढून देशांतर्गत फूट निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

१९. राष्ट्राची एकात्मता - विविधतेने नटलेले राष्ट्र एकात्म रहायला हवे. आम्ही एकमेकांमध्ये इतके मिसळून जावे की एकापेक्षा दुसरा वेगळा आहे असे चित्रही न दिसावे. असे आश्वासन मिळावे.

२०. बंधुता - देशातील नागरिकांनी एकमेकांशी वागताना बंधुत्व भावनेने वागावे. जगावे. प्रत्येक व्यक्ती आपलाच आहे ही भावना निर्माण व्हावी.

२१. प्रवर्धित करण्याचा - वरील सारे भारतात निर्माण करण्याचा. . .

२२. संकल्पपुर्वक निर्धार - मनामध्ये पक्का विचार करुन, ठेवून, मनात नक्की करुन. आमच्या संविधान सभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान.

२३. अंगीकृत - भारतीय संविधान "स्वीकारून"

२४. अधिनियमित - या बाबतचा नियम, कायदा बनवुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

अशा प्रकारे संविधान प्रास्ताविकेतील शब्दांचेमहत्व लक्षात घेऊन, सर्वांपर्यंत पोहचविण्यासाठी कार्यानंदी प्रयत्न आपण करूयात..!

समारोप : मानवी जीवन हे मंगलमय असले पाहिजे. त्यांतून नित्य मांगल्याचा प्रकाश सर्वदूर पसरून समाजात शांति समृद्धी निरामयता इ. वाढविण्यासाठी भारतीय सविधानाची प्रास्ताविका अत्यंत उत्तम कार्यानंद बजावते. तत्वज्ञ लिओ टॉलस्टॉय नेहमी म्हणत की, "इतर शास्त्रांचे अभ्यास आधी बंद करा. समाजात परस्परांविषयी कसे वागावयाचे त्याचे शास्त्र आधी सिद्ध होऊ दे. सर्वशास्त्रांत मुख्य शास्त्र म्हणजे हे समाजशास्त्र होय. म्हणूनच समाजात व देशात सर्वांना सुख मिळावे. सर्वांना ज्ञान मिळावे, सर्वांना पोटभर खायला अन्न मिळावे, अंगभर ल्यायला वस्त्र मिळावे, सर्वांच्या विकासाला वाव असावा, कोणी कोणास हिणवू नये, प्रबळाने दुर्बळाला पिळू नये, दुसऱ्यास गुलाम करू नये, स्वतः च्या हवेल्या बांधून दुसऱ्यांच्या घरांच्या होळ्या करू नयेत, एकाने जगावे म्हणून दुसऱ्याने मरावे असे होऊ नये. यासाठी भारतीय समाजातील जातीजातींचे असे प्रेमसंबंध जोपर्यंत दृढ होत नाहीत, तोपर्यंत देशात खरी लोकशाही येणार नाही. या खऱ्या स्वत्रांत्र्यासाठी २६ नोव्हेंबर संविधान दिनी संविधानांचा जागर करुयात.यासाठी ज्ञानदायक व सदभिरुचीपूर्ण भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेतील प्रत्येक शब्दाचा अर्थ समजून घेऊयात.

तडजोडी शिवाय कुठलेही विधायक कार्य होत नसते. समाज सेवेसाठी उत्सुक असणाऱ्यांनी सर्व प्रथम ज्ञान - माहिती संपादन व्यासंगाचा पाया आपल्या ठिकाणी भक्कम केला पाहिजे. हाच सर्व भारतीयांनी साविधानाचे शुल्क (फिस) भरण्याचा सार्थ मार्ग आहे.




**प्रा. विजयकुमार पाईकराव**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
मो.९४०३७७४५२९


## इकरा पब्लिक स्कूल मध्ये संविधान दिन उत्साहात साजरा





**जळगाव :** इकरा पब्लिक शाळेत संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणुन संगीता भालेराव होते. प्राचार्य शेख शकील यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. शफीक अन्सारी यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन घेण्याचा कार्यक्रम पार पाडला व उद्देशिकेचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर तरन्नूम खान यांनी धर्मनिरपेक्ष ह्या शब्दाबद्दल व संविधानाबद्दल बोलून आपल्या भाषणाने सर्वांना संबोधित व मंत्रमुग्ध केले.दानिश अहमद यांनी संविधानातील मूलभूत हक्क व मूलभूत अधिकार यांच्याबद्दल माहिती देत सखोल मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरीफ खान यांनी केले. तर आभार प्रदर्शन रोजमीन खान यांनी केले व कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला. संविधानाबद्दल व त्यातील लहान मोठे पैलू समजून घेण्यासाठी विद्यार्थी यांना मदत व्हावी तसेच कायद्याच्या मुख्य स्थानी असलेल्या संविधानाबद्दल जनजागृती व्हावी हे कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. विद्यार्थी वर्गात अभ्यासाचे वातावरण रहावे याकरिता असे अनेक कार्यक्रमाचे आयोजन इकरा पब्लिक शाळा करत असते व त्याकरिता अनेक अनुभवी व मोठ्या वक्ते मंडळींना त्या निमित्ताने बोलवले जाते त्यामुळे विद्यार्थी वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद कार्यक्रमांना नेहमी पाहायला मिळतो.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ नोव्हेंबर २०२५


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा



**जालना :** भारतीय संविधानाने सर्व सामान्य लोकांना हक्क आणि अधिकार दिले आहेत. या संविधानाचे नीट आणि गंभीरपणे पालन होणे आवश्यक आहे. पण अलीकडे अनेक संस्थांकडून याचे उल्लंघन होत असल्याचे दिसते, जे लोकशाहीसाठी योग्य नाही. त्यामुळे प्रत्येकाने जबाबदारीने वागून देशासाठी आपले कर्तव्य पार पाडणे गरजेचे आहे, असे प्रा. बळीराम कटारे यांनी सांगितले.बारवाले महाविद्यालयात संविधान दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य कविता प्राशर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाला एनएसएसचे विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान या देशासाठी चिरंतर साधन : डॉ. बाळासाहेब लिहिणार




**करमाड :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे राज्यशास्त्र व एन एस एस विभागाअंतर्गत संविधान दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून मराठी भाषा विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब घेणार यांची प्रमुख उपस्थिती होती.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे हे होते. या कार्यक्रमात बोलताना डॉ. बाळासाहेब लिहिणार म्हणाले संविधान निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांच्यावर लिखित घटना तयार करणे ही मोठी जबाबदारी होती. मसुदा समितीचे सात प्रमुख सदस्य होते त्यातील कोणी आजारी कोणी परदेशी तर तर कोणाचा मृत्यू झाला असल्यामुळे ती जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना एकट्यांनाच पार पाडावी लागली. विविध भाषा, विविध प्रांत, विविध संस्कृती आणि विविध धर्म यांची सांगड घालून घटना तयार करणे हे अत्यंत किचकट असलेले काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व धर्म सम भाव या हेतूतून पार पाडले. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे म्हणाले एकता, समानता, आणि धर्मनिरपेक्षता ही उद्दिष्टे समोर ठेवून बाबासाहेबानी या देशाचे संविधान तयार केले. सामान्य माणसापासून ते उच्च उत्पन्न गटातील व्यक्तींना संविधानामुळे समान हक्क प्राप्त झाला असे डॉ. मुळे सर म्हणाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रमेश कचरे यांनी केले तर संविधान उद्देश पत्रिकेचे वाचन व आभार प्रा. प्रशांत माठे यांनी मानले. यावेळी डॉ. कालिदास फड डॉ. नरेश डहाळे डॉ. लक्ष्मण दांडगे, प्रसन्न वैद्य, भगवंत देशपांडे डॉ. सुखदेव पोटदुखे डॉ. नानासाहेब लावंड डॉ. ललित गोल्डे,डॉ. नितीन मुळे, डॉ. इम्रान पठाण प्रा. लक्ष्मण खरात प्रा.योगेश शिंदे प्रा. तन्मय भावसार, अविनाश साळवे, शिवकुमार मुक्तापुरे प्रा. हरिदास होळकर मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव, कैलास जाधव, व इतर सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## शैक्षणिक संवादाला नवी दिशा : डॉ. राठी यांचा गांधी महाविद्यालयात सत्कार समारंभ



**कडा :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे विभागीय संचालक प्राचार्य डॉ नंदकुमार राठी सर यांची श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे ,गांधी महाविद्यालय कडा, ता आष्टी जिल्हा बीड येथे सदिच्छा भेट, निमित्ताने त्यांचा सत्कार करताना, संस्थेचे प्रधानमंत्री माननीय हेमंतकुमारजी पोखरणा शेठ, उपाध्यक्ष , माननीय अनिलकुमारजी झाडमुथा शेठ, गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रोफेसर डॉ जवाहरलाल भंडारी सर, प्रशासकीय अधिकारी ,मा प्राचार्य नवनाथ पडोळे सर, श्री सोभाचंद ललवाणी, वाय सी एम ओ यु चे केंद्रसंयोजक प्रोफेसर डॉ अशोक कोरडे पा, महाविद्यालयाचे पर्यवेक्षक, प्रोफेसर डॉ अनिल गर्जे, तंत्रसहाय्यक श्री ज्ञानेश्वर खंदारे यावेळी उपस्थित होते.

## महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा या शाळेत संविधान दिन साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा या शाळेत संविधान दिन साजरा करण्यात आला या निमित्ताने विद्यार्थ्यांनी संविधानाविषयी भाषण दिले तसेच संविधानाच्या उद्देश पत्रिका चे वाचन करण्यात आले शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रभाकर पुजाबा शिंदे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले तसेच शाळेतील ज्येष्ठ शिक्षक वसंत राठोड यांनी संविधानाविषयी सविस्तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमाला मनीषा शिंदे अनुजा भीगोले, जाहेदखान पठाण रेवनवार विशाखा अरुणा फुलंब्रीकर हे शिक्षक उपस्थित होते

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ नोव्हेंबर २०२५


## आम्ही पालकांकडून मतदान करून घेणारच विद्यार्थ्यांनी केला संकल्प



**कन्नड (अरुण थोरात) :** संविधान दिनाच्या निमित्ताने निवडणूक निर्णय अधिकारी एकनाथ बंगाळे, मुख्याधिकारी रविंद्र लांडे यांच्या मार्गदर्शना खाली कन्नड येथील स्वीप पथकाच्या माध्यमातून दि.26 नोव्हेंबर रोजी कन्नड शहरातील साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात मतदान विषयक जनजागृती करण्यात आली.यावेळी स्वीप पथकाचे सदस्य प्रवीण दाभाडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, येणाऱ्या दोन नोव्हेंबर रोजी कन्नड येथे नगरपालिकेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना सांगा की आपल्या कन्नड शहराच्या विकासासाठी आणि एका जबाबदार भारतीय नागरिकाचे कर्तव्य पूर्ण करण्यासाठी आवर्जून मतदान करा.यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक धैर्यशील केरे, संस्था प्रतिनिधी नितीन पाटील, राकेश निकम, शिवराज पाटील, उत्केश वाळुंजे यांसहित उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांनी निर्भयपणे व निपक्षपातीपणे मतदान करण्याची शपथ घेतली. यावेळी स्वीप पथकाचे प्रमुख योगेश पाटील, भाग्यश्री बेडगे, प्रतिभा कदम, भाऊसाहेब सोननीस, दीपक सोनवणे यांची उपस्थिती होती.

## मनपा शाळेत संविधान दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला.इयत्ता ६ वीच्या विद्यार्थ्यांनी बालसभा उपक्रमांतर्गत संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी यशस्वीरीत्या सांभाळली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालनापासून ते विचारप्रदर्शनापर्यंत सर्व काही त्यांनीच यशस्वी केले यासाठी श्रीमती अर्चना पंडित मॅडम यांनी विद्यार्थ्यांना विशेष प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तीन भाषांमध्ये भारतीय संविधानाची निर्मिती, त्याचे वैशिष्ट्ये आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अतुलनीय योगदानावर प्रभावी भाषणे सादर केली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी उपस्थित होते. तसेच श्री. सचिन गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना संविधानाच्या मूल्यांचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाच्या समारोपाला संविधानाच्या उद्देशिकेचे (Preamble) सर्वांनी मिळून सामूहिक वाचन केले. या प्रसंगी भारतीय संविधानाची प्रत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहण्यासाठी व अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आली होती. कार्यक्रमास सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होते.विशेष बाब म्हणजे, श्रीमती अर्चना पंडित मॅडम यांचा आज वाढदिवस असल्याने त्यांच्या वतीने इयत्ता ८ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना कंपास बॉक्स भेट म्हणून वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मॅडमना हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि त्यांचे आभार मानले.

## डॉ. सौ. इं. भा. पा. महिला महाविद्यालयात संविधान दिन साजरा




**छत्रपती संभाजीनगर :** महाविद्यालयात 26 नोव्हेंबर रोजी संविधान दिनाच्या अनुषंगाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुनील सोनवणे (राज्यघटनेचे गाढे अभ्यासक) व मा. मंजू मंठाळकर (आहार तज्ञ) उपस्थित होत्या तर अध्यक्षस्थान प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी भूषवले. मूलभूत अधिकारांचा उपभोग आपल्याला घ्यायचा असेल तर समाज विघातक प्रवृत्ती ठेचून लोकशाही संवर्धनासाठी सर्वांनी पुढे यावे असे आवाहन डॉ. सुनील सोनवणे यांनी केले. मा. मंजू मंठाळकर यांनी आहार नियंत्रणावर भाष्य करताना दैनंदिनी आणि आरोग्यास हानिकारक ठरत असलेली आजची अन्न संस्कृती यांचे तोटे लक्षात आणून दिले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्या सुनीता बाजपाई यांनी वेळेच्या नियोजनाकडे लक्ष वेधत सामाजिक व शारीरिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले. संविधान दिनानिमित्त महाविद्यालयात भित्तिपत्रक प्रदर्शन, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा, सेल्फी पॉईंट इ. उपक्रमांचे आयोजन राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आलेले होते. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी संविधान उद्देशिकेचे वाचन प्रा. पूजा दीक्षित यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अजय पवार यांनी तर प्रास्ताविक प्रा. किरण कुलकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. राहुल हिवाळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. सुषमा देशपांडे, डॉ. मीनल अंकलवार, प्रा. माधुरी भावसार, प्रा. शिला जीरे यांच्यासह सर्व प्राध्यापक, कर्मचारी वर्ग यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ नोव्हेंबर २०२५


## अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रवीण दाभाडे यांची निवड



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड येथील प्रतिभावंत कवी, वक्ते, बहुआयामी शिक्षक प्रविण मच्छिंद्रनाथ दाभाडे यांची सातारा येथे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील कवी कट्टा या विचार मंचावर कविता सादरीकरणासाठी निवड झाली आहे.ते काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालय कन्नड येथे सहशिक्षक म्हणून कार्यरत आहेत.जानेवारी महिन्यात सातारा येथे होणाऱ्या 99 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहेत. यात भाषा साहित्य संस्कृती परिषदेचे तालुकाध्यक्ष प्रवीण दाभाडे यांच्या 'बुजगावण्याच सोंग' या कवितेची निवड झाली आहे. कवी प्रविण दाभाडे यांनी आता पर्यंत विविध राज्यस्तरीय कवि संमेलनांत कविता सादरीकरण केले आहेत. तसेच त्यांचा उत्कृष्ट सुत्रसंचालन, वकृत्व यात ही हातखंडा आहे. ते शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून तालुक्यातील विविध निवडणुका काळात मतदार जागृतीचे कार्य करतात. त्यांना अनेक सन्मानांनी गौरविण्यात आले आहे.त्यांच्या या निवडीबद्दल जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव, तिफणकार डॉ.शिवाजी हुसे, जेष्ठ साहित्यिक डॉ.संजय गायकवाड, अॅड.कृष्णा जाधव, अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, शिवराज पाटील, लक्ष्मण वाल्डे, संदीप वाकडे आदींनी अभिनंदन केले आहे.

## माधवराव पाटील महाविद्यालयात संविधान दिन व शहीद जवानांना श्रध्दांजली अर्पण



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती, धाराशिव, राज्यशास्त्र पदवी-पदव्युत्तर व संशोधन केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, केंद्र व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (ता. २६) रोजी ७७ वा संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी २६ /११ हल्ल्यातील शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील मदन सुरवसे, सचिनसिंग ठाकूर यांनी सामुहिक संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन केले. या दिनाचे औचित्य साधून यावेळी प्रा. डॉ. सायबण्णा घोडके यांनी संविधानाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, प्रा. डॉ. सतिश शेळके, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. शिला स्वामी, महाराष्ट्र पत्रकार संघाचे मराठवाडा कार्यकारिणी सदस्य प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. डॉ. शिवपुत्र कानडे, डॉ. सुजित मठकरी, डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, प्रा. राजकुमार रोहीकर, डॉ. रवींद्र गायकवाड, प्रा. डॉ. मुकुंद धुळेकर, डॉ. अविनाश मुळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. नरसिंग कदम, डॉ. विलास खडके, प्रा. अजिंक्य राठोड, सुरेखा पाटील, दत्तू गडवे, अमोल कटके, प्रजीत कांबळे, सोहन कांबळे, नितीन गजधाने, अमर गजधाने, दिनेश कांबळे आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. राजेंद्र गणापुरे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मानले. यावेळी विविध शाखेतील विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित आरोग्य तपासणी शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**कन्नड (प्रतिनिधी) :** श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, कन्नड संस्थेचे माजी अध्यक्ष लोकनेते सहकारमहर्षी बाळासाहेब पवार (आप्पासाहेब) यांच्या 26व्या पुण्यतिथीनिमित्त श्री छत्रपती शिवाजी फार्मसी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेले मोफत आरोग्य तपासणी शिबिर मंगळवारी उत्साहात पार पडले.सकाळी १०.३० वाजता प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. विद्यार्थ्यांपासून ते शिक्षक, पालक तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घेतला.शिबिरात ब्लड शुगर, रक्तदाब, वजन बॉडी मास इंडेक्स, रक्तगट, हिमोग्लोबिन तपासणी तसेच इतर प्राथमिक . तपासण्या करताना नागरिकांना त्यांच्या आरोग्याविषयी आवश्यक मार्गदर्शनही देण्यात आले. फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सर्व तपासण्या करून आरोग्यसंबंधी जागरूकता, आहार व जीवनशैलीविषयक महत्त्वपूर्ण माहिती दिली.या कार्यक्रमास संस्थेचे सचिव मा. श्री चंद्रकांत अण्णा देशमुख, डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए.के. महाले, कृष्णाभाऊ पाटील निकम, प्राचार्य डॉ. भोसले, प्राचार्य डॉ . राहुल क्षीरसागर व संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या समाजाभिमुख कार्याला अभिवादन म्हणून दरवर्षीप्रमाणे यंदाही हा आरोग्य उपक्रम राबवण्यात आला असल्याचे आयोजकांनी सांगितले. शिबिर यशस्वी करण्यासाठी मदत करणाऱ्या डॉक्टर, विद्यार्थी, अध्यापक, कर्मचारी तसेच उपस्थित राहणाऱ्या सर्व नागरिकांचे आभार व्यक्त करण्यात आले.





दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ नोव्हेंबर २०२५

## सामाजिक एकोपा जोपासत विकासाची कास धरून ५० वर्षे सर्व धार्मियांना संधी दिली-बसवराज पाटील



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** १९७४ ला स्व. चैतन्यमूर्ती माधवराव पाटील काका मुरूम नगर परिषद वर नगराध्यक्ष म्हणून निवडूण आले आणि तेंव्हा पासून तब्बल ५० वर्षापासून पाटील परिवाराने मुरूम शहराची सेवा करत आली आहे, वडिलांच्या पश्चात मी आणि त्यानंतर बापूराव पाटील यांनी सामाजिक सलोखा जोपसत विकासाची कास धरून मुरूम नगर परिषद कारभार यशस्वीपणे हातळले, या ५० वर्षाचा इतिहास पाहता पाटील परिवाराने सर्व धर्मातील सर्व समान्य नागरिकांना नगराध्यक्ष पद भुसविण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली. २०२५ चा होऊ घातलेला निवडणूक ही प्रतिष्ठेची आहे, पाटील परिवाराने शहर वासीय आपले कुटुंबातील व्यक्तीप्रमाणे वागणूक देऊन त्यांच्यावर येणाऱ्या प्रत्येक संकटात खंबीरपणे उभे राहून त्यावर मात केली आहे आणि शहराच्या सामाजिक सलोखा आणि विकासात्मक दृष्टीकोण पाहता मुरूम शहरातील प्रत्येक नागरिकांचा यामध्ये योगदान असून २०२५ होऊ घातलेल्या निवडणुकीत मी एक कार्यकर्ता या नात्याने बापूराव पाटील यांनी मुरूमची सेवा करावी आणि आणखीन विकासाची कामे त्यांच्या हातून घडावे ही अपेक्षा ठेऊन त्यांना निवडणूक मैदानात उतरावले असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले, पुढे बोलताना पाटील म्हणाले ५० वर्ष पाटील परिवाराने सेवा दिली आहे आणि त्याच सेवेची रसद म्हणून बापूराव पाटील यांना प्रचंड बहूमताने विजयी करा जेनेकरून मी संपूर्ण राज्यभर उजळ मात्याने फिरता येईल आणि "माझ्या गावाच्या निवडणुकीत नागरिकांनी प्रचंड बहूमताने निवडून दिले"असे अभिमानाने सांगता येईल. जनतेचा पाटील परिवारावरील प्रेम आणि विश्वासामुळेच ५० वर्षे सत्ता ताब्यात ठेवण्यात यश आले आणि यापुढेही आपले प्रेम, विश्वास, आशीर्वाद पाठीशी राहील अशी अपेक्षा व्यक्त करतो असे मत मुरूम शहरात विविध ठिकाणी आयोजित कॉर्नर बैठकीत बोलताना पाटील यांनी व्यक्त केले. दि. २५ वार मंगळवार रोजी नगर परिषद निकडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुरूम शहरातील मार्केट यार्ड, राजशेखर मुदकण्णा कॉम्प्लेक्स येथे मुरूम व्यापारी, आणि रोटरी क्लब च्या वतीने आयोजित कॉर्नर बैठक, भीम नगर, अशोक चौकातील महादेव मंदिर मंगल कार्यलयात आयोजित कॉर्नर बैठकी दरम्यान ते बोलत होते. कॉर्नर बैठकी दरम्यान सर्वच ठिकाणी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिल्यामुळे सभेचे स्वरूप प्राप्त झाले.शेवटी बोलताना म्हणाले नगराध्यक्ष पदासाठी बापूराव पाटील मैदानात नसून मुरूमचा प्रत्येक नागरिक नगराध्यक्ष पदाचा उमेदवार असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. ५० वर्षात मुरूम शहराचा भरभरून विकास झाला असून यापुढेही विकासात सात्यता कायम ठेवण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे सर्वच उमेदवाराचे हात बळकट करण्याची विनंती त्यांनी केली, केंद्रात आणि राज्यात भाजप सत्तेत असल्यामुळे मुरूम शहराच्या विकासात भर करण्यास मदत मिळेल असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

## तिफण राज्यस्तरीय वाङ्मयीन पुरस्कार जाहीर

**कन्नड :** येथून गेली 17 वर्षापासून सातत्याने प्रसिद्ध होणारे भाषा, साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफण व तिफण वाचक चळवळ यांच्या वतीने 202 3-2024 या वर्षातील साहित्यकृतींना देण्यात येणारे तिफण राज्यस्तरीय वाङ्मयीन पुरस्कारासाठी विविध वाङ्मय प्रकारातील पुस्तके मागविण्यात आली होती. सदरील पुरस्कार जाहिर करण्यात येत आहे.ना. धो.महानोर तिफण काव्य पुरस्कार - रमेश चिल्ले, लातुर (पाणीबाणी नंतरच्या कविता ), रा. रं. बोराडे तिफण कादंबरी पुरस्कार - अरुण नवले, सोलापूर ( जागल ), लोकशाहीर - साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे तिफण कथा लेखन पुरस्कार - अलकनंदा आंधळे - घुगे ( अर्धा कोयता ), यशवंतराव चव्हाण तिफण चरित्र - आत्मचरित्र पुरस्कार - प्रा. केशव वसेकर (वसा केशवांचा ), महात्मा फुले तिफण नाटयलेखन पुरस्कार - चुडाराम बल्हारपुरे, गडचिरोली - गोंडवनाचा महायोद्धा क्रांतिविर बाबुराव शेडमाके, तिफण ललितलेखन पुरस्कार - माणिक पुरी, परभणी ( तळे, पक्षी आणि माळरान )(डॉ. वासुदेव मुलाटे तिफण समीक्षा - संपादन पुरस्कार - डॉ. वैशाली गुंजेकर, कोल्हापूर ( साठोत्तरी प्रवासवर्णने : वाटा आणि वळणे ), सानेगुरुजी तिफण बालसाहित्य पुरस्कार - डॉ. मंदा नांदुरकर , अमरावती ( फुलकई ), यांची निवड करण्यात आली आहे. राज्यभरातून या पुरस्कारासाठी पुस्तके प्राप्त झाली होती. त्यातून ही निवड करण्यात आली आहे. एका विशेष कार्यक्रमात हे पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येईल अशी माहिती तिफण त्रैमासिकाचे संपादक पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष तथा संयोजक प्रा. डॉ. शिवाजी हुसे, प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, प्रा. डॉ. दिलीप बिरुटे,प्रा. डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. सुधाकर जाधव, यांनी दिली आहे.

## १८ वर्षाखालील ज्युनिअर व्हॉलीबॉल संघाची निवड चाचणी २९ नोव्हेंबरला

**कन्नड (कृष्णा शिंदे) :** ज्युनिअर राज्य व्हॉलीबॉल अजिंक्यपद स्पर्धेसाठी (१८ वर्षाखालील मुले व मुली) निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन नवी मुंबई येथे दिनांक:- ५ ते ७ डिसेंबर २०२५ या कालावधीत १८ वर्षाखालील मुले व मुली गटातील राज्यस्तरीय ज्युनिअर स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे . या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठीछत्रपती संभाजी नगर विभागाच्या मुला व मुलीच्या संघाची निवड करण्यासाठी निवड चाचणी स्पर्धा दिनांक:- २९/११/ २०२५ रोजी, विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा परिसर, येथे दुपारी २. 00 वाजता आयोजित केलेली आहे .स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूची जन्मतारीख ही दिनांक:- १/१/ २००८ नंतरची असावी .या निवड चाचणी स्पर्धेसाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा असे आवहन छत्रपती संभाजी नगर विभागीय सचिव श्री.सतीश पाठक, जालना जिल्हा सचिव अक्रम काजी, परभणी जिल्हा प्रमोद गाडेकर, हिंगोली सचिव नावीत पठाण, छत्रपती संभाजीनगर संघटनेचे उपाध्यक्ष श्री उन्मेश शिंदे , प्रवीण शिंदे, अभिजीत दिक्कत, सोमनाथ टाक, रोहित पाटील, सोमनाथ पचलूरे, प्रा.नारायण शिंदे, श्रीमती ज्योती दांडगे, जब्बार पठाण, आशिष शुक्ला, प्रफुल कुलकर्णी, आसिफ पठाण, गणपत पवार, लोकेश ठाकरे, अभिषेक गणोरकर, विलास राजपूत, यांनी केले आहे.

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत संविधान दिन समारंभ



**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** जे ईएस महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला यावेळी उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना ,पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. आर एस सोनवणे प्रा. समाधान पवार प्रा. किशोर खरात प्रा.प्रकाश पवार आदी उपस्थित होते.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ नोव्हेंबर २०२५

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा




**सिल्लोड :** २६ नोव्हेंबर २०२५यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संविधान दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पंडित यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाली. उपस्थितांनी संविधान निर्मात्यांना सन्मानपूर्वक अभिवादन केले.यानंतर प्राचार्य डॉ. अशोक पंडित यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया, त्यामागील विचारसरणी आणि सामाजिक मूल्यांची सखोल माहिती दिली. त्यांनी सांगितले की,“डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, तत्त्वज्ञान आणि जीवनकार्य आत्मसात करणे हीच खरी संविधानपूजा आहे. त्यांच्या विचारांची अंमलबजावणी केल्याशिवाय मनुष्य, समाज व राष्ट्राची खरी प्रगती शक्य नाही.”कार्यक्रमाचा मुख्य भाग म्हणून प्राचार्य डॉ. पंडित यांनी संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन केले. त्यांच्या पाठीमागे उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करून संविधानाचा आदर, निष्ठा आणि मूल्ये जपण्याची शपथ घेतली.कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गंगाधर मोरे, डॉ.प्रफुल्ल पाटील,डॉ.सुधीर नाफडे, डॉ. विवेक पिसे, डॉ. राजेश माकणीकर,प्रा.मंगल ठाकूर, डॉ. सुनिता जावळे, श्री. विष्णू जगताप, ज्ञानेश्वर सांगळे यांसह अनेक प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा सहभागी लक्षणीय असून कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे सुयोग्य सूत्रसंचालन प्रा. सुनील पोवळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. राजेंद्र कोळी यांनी मानले.

# भारतीय संविधान दिन साजरा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारत शिक्षण संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय मुरूम मुरूम येथे भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला प्रथम भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले यानंतर या महाविद्यालयातील प्रा.शेषेराव राठोड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले यावेळी प्रा शेषेराव राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना भारताचे संविधान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समिती स्थापन झाली अनेक बैठकीनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा 26 नोव्हेंबर 1949 रोजी स्वीकारला गेला त्यामुळे 26 नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून आपण साजरा करतो या संविधान दिनामुळे आपल्याला अधिकार कर्तव्य समता न्याय स्वातंत्र्य आणि लोकशाही समजून घेण्यास मदत करते असे मत प्रा. शेषराव राठोड यांनी व्यक्त केली यानंतर महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थी हातात हात घालून साखळी तयार करण्यात आली व आम्ही भारताचे लोक या घोषवाक्याने या मानवी साखळीची सुरुवात करण्यात आली संविधानातील एकता व अखंडता या मूल्याच्या अनुभव या मानवी साखळीतून निर्माण होतो या मानवी सत्तेमुळे सामाजिक ऐक्याचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने या मानवी साखळीचे आयोजन केले असे मत प्राचार्य गोविंद इंगोले यांनी व्यक्त केले व भारतीय संविधानाचे वाचन करण्यात आले यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. गजानन उपासे प्रा. प्रसाद इंगोले प्रा. किसन माने प्रा. बालाजी इंगोले प्रा वर्षा हलगुंडे प्रा.प्रकाश चव्हाण प्रा. भगवंत चौगुले प्रा. सुजित चिकुंद्रे प्रा. किशोर कांबळे प्रा.विनय इंगळे प्रा. रोहन हराळकर अवधूत गुरव, सुरेश वाघमारे अनिकेत सगट आदी उपस्थित होते.

# स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, नागद येथे प्रतिबंधीत गुटखा जप्त



**कन्नड (अरुण थोरात) :** स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत नागद ता.कन्नड येथील व्यापार्या कडून प्रतिबंधीत सुगंधी पानमसाला (गुटखा) जप्त केला आहे.याबाबद दिलेल्या प्रसिद्धी पत्रानुसार, स्थानिक गुन्हे शाखा यांना दि. २५नोव्हेंबर रोजी मिळालेल्या गुप्त माहिती नुसार,नागद येथील मारवाडी गल्लीतील एका व्यापाऱ्याने आपल्या घरा समोरील ओसरीत, शासनाने प्रतिबंधीत केलेला सुगंधी पानमसाला बेकायदेशीरपणे चोरट्या विक्री करण्याच्या उद्देशाने साठवून ठेवला आहे. मिळालेल्या माहिती वरुण स्थानिक गुन्हे शाखा पथकाने छापा टाकून कारवाई केली. यात शासनाने बंदी घातलेला सुगंधी पानमसाला व तंबाखू असा ८६०३१ रुपये किंमतीचा माल जप्त करुण आरोपी दिपक प्रविणचंद ऊर्फ मंगलचंद बेदमुथा(३२ वर्षे) रा. नागद ता. कन्नड याच्या विरुद्ध पोलीस ठाणे कन्नड ग्रामीण येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.सदरील कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक विनयकुमार राठोड, अपर पोलिस अधीक्षक अन्नपुर्णा सिंह, सहाय्यक पोलिस अधीक्षक उपविभाग कन्नड अपराजिता अग्निहोत्री, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंह राजपूत, सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन इंगळे, पोहेकॉ. विष्णु गायकवाड, शिवानंद बनगे, अशोक वाघ, पोलीस अंमलदार महेश बिरुटे, पोशि. अनिल काळे, संजय तांदळे, पोलीस स्टेशन कन्नड ग्रामीण चे पोहेकॉ. श्री मोतिंगे, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील महिला पोलिस अंमलदार शितल बारगळ, तसेच अन्नसुरक्षा निरीक्षक श्री सिद्दीकी आदींनी पार पाडली.

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी
शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस
DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स
PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास
C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास
E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास
O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास
PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics
रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्टोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास
9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ नोव्हेंबर २०२५


## संकटसमयी आर्थिक मदतीचे पाठबळ व्हाट्सअप ग्रुपचे कार्य अभिमानास्पद



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जिल्ह्यातील वाढवणा पाटी व्हाट्सअप ग्रुपच्या वतीने वाढवणा बु. (ता.उदगीर ) येथील दोन कुटुंबांना आर्थिक मदतीचा हात देन्यात आला...वाढवणा बु.येथील राम यादवराव पुंड हे किडणी या आजाराने त्रस्त होते या कुटुंबाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने उपचारासाठी पैसे नसल्याची माहिती मिळाली आणि आपल्या ग्रुप कडुन त्यांना 50000 (पन्नास हजार) रु मदत करन्यात आली. वाढवणा बु येथील कै रमेश शंकर राव गायकवाड हे कॅन्सर या आजाराने मरण पावले त्यांच्या कुटुंबातील करता मानुस गेल्याने घरची परीस्थिती हालाकीची झाली असल्याने त्यांच्या कुटुंबाला रु 20500 (विस हाजार पाचशे) रु मदत करन्यात आली. या वेळी संतोष सोमासे, सरपंच थोंटे नागेश, बालाजी बामणे, सोमा पाटील, रितेश राजमाणे, भगवान गोटमुकले,सोनु मठपती, बबन भांगे, व्यंकट मुंडकर, मठपती साई, हारणाळे आक्षय, मारोती भांगे, सचीन बामणे उपस्थित होते.

## अधिकारांसोबत कर्तव्यांची जाणीव असली तरच राष्ट्र बळकट - न्यायाधीश गीता बनकर



**उमरगा :** २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधानाचा स्वीकार करण्यात आला. त्यामुळे २६ नोव्हेंबरला संविधान दिन साजरा केला जातो. संविधानामुळेच व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा समान अधिकार प्राप्त झाला. परंतु राष्ट्राच्या बळकटीसाठी मूलभूत अधिकारांबरोबरच नागरिकांना कर्तव्याची जाणीव होणे देखील गरजेचे आहे, असे मत उमरगा येथील दिवाणी न्यायाधीश न्या. गीता बनकर यांनी व्यक्त केले. त्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि एनसीसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान वाचन सभेत बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. पुढे बोलताना न्या. गीता बनकर म्हणाल्या की, “भारतीय संविधानाने आपल्याला अभूतपूर्व अधिकार दिले आहेत; परंतु त्या अधिकारांचे मूल्य टिकवायचे असल्यास प्रत्येक नागरिकाने आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजेत. अधिकार व कर्तव्य यांचा समतोल साधला तरच राष्ट्र बळकट होते.” यावेळी व्यासपीठावर डॉक्टर, वकील, न्यायाधीश अशा वेगवेगळ्या वेशभूषेत येवून विद्यार्थ्यांकडून संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. संविधान दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेत कु. मुल्ला अफ्रिन प्रथम पारितोषिक, कु. इंगळे प्रियंका आणि पांचाळ श्रुती यांना द्वितीय पारितोषिक, खामकर श्रेयश तृतीय पारितोषिक, तर जाधव प्राजक्ता यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. सर्व पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा बक्षिसाची रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या संविधानिक मूल्यांना रुजविण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी जबाबदार, संवेदनशील आणि कायद्याचे पालन करणारे नागरिक बनावे, असे आवाहनही त्यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ . भरत शेळके यांनी केले. सूत्रसंचालन डॉ अनिल देशमुख यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. डी. एस. चिट्टमपल्ले यांनी मानले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे, प्रा. सुनील बिराजदार, डॉ. विनोद देवरकर, डॉ. अशोक पदमपल्ले, डॉ. डी. डी. ढोबळे, प्रा. मुरली जाधव, सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती संभाजीनगरात एसएफआयचा संविधान जागर



**छत्रपती संभाजीनगर :** "भारतीय संविधानाला अपेक्षित असलेला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय प्रस्थापित करण्यासाठी आजच्या युवा पिढीला सक्रिय योगदान द्यावे लागणार आहे, तेव्हाच संविधानाचा खरा उद्देश सफल होईल," असे प्रतिपादन स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियाचे (SFI) जिल्हा सचिव अरुण मते यांनी केले. एसएफआयच्या वतीने शहरात मंगळवारी (26 नोव्हेंबर) संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

शहरातील विविध शाळा, महाविद्यालये आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरामध्ये एसएफआयच्या वतीने संविधान दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसोबत सामाजिक चळवळीतील परिवर्तनवादी गाणी गाऊन वातावरणनिर्मिती करण्यात आली. तसेच, भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. संविधानातील मूलभूत मूल्ये, लोकशाही, समानता आणि न्याय या विषयांवर चर्चासत्रे आयोजित करून ही मूल्ये दृढ करण्याचा संकल्प उपस्थित विद्यार्थी, शिक्षक आणि कार्यकर्त्यांनी केला.एसएफआय छत्रपती संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष मनिषा बल्लाळ यांनी आज संविधानानिक मुल्यांवर हल्ले होत असून त्याविरोधात आपण भारतीय म्हणून ठामपणे उभे राहिले पाहिजे असे सांगितले. या प्रसंगी जिल्हा कमिटी सदस्य शितल चोपडे, विजय उमाळे, अशितोष ठोंबरे, प्रदीप तेलंग, संकेत चव्हाण,सुरज देवकर, गितीका आवटे व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन एसएफआय जिल्हा कमिटीने केले.संविधान दिनानिमित्त झालेल्या या कार्यक्रमास विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ नोव्हेंबर २०२५


## भारतातील अवयवदानाची नैतिक आणि मानवी गरज

**मा**नवी जीवन अमूल्य आहे. विज्ञान, वैद्यक आणि तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीमुळे मानवी आरोग्यसेवा अधिक सक्षम, प्रभावी आणि जीवनरक्षक झाली आहे. आज अनेक गंभीर आजारांवर उपचार शक्य झाले आहेत; पण काही अवस्थांमध्ये औषधोपचार किंवा शस्त्रक्रिया पुरेशी ठरत नाही. अशा स्थितीत अवयव प्रत्यारोपण (Organ Transplantation) हीच अंतिम आणि एकमेव उपचारपद्धती ठरते. मूत्रपिंड निकामी होणे, यकृताचे विकार, हृदय अपयश, कॉर्नियाचे आजार, फुफ्फुसांचे विकार अशा अनेक गंभीर आजारांमुळे हजारो रुग्ण जीव-मरणाच्या संघर्षात दिवसेंदिवस अडकत आहेत. या पार्श्वभूमीवर 27 नोव्हेंबर रोजी पाळला जाणारा 'भारतीय अवयव दान दिन' हा केवळ दिनविशेष नसून मानवतेचे आणि करुणेचे स्मरण करून देणारा दिवस आहे. हा दिवस आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो तो प्रश्न म्हणजे "मृत्यूनंतर देह थांबतो, पण त्यातील अवयवांनी इतरांचे जीवन पुन्हा सुरू होऊ शकते, मग आपण का मागे पडतो?"अवयवदान ही केवळ वैद्यकीय संकल्पना नसून ही संकल्पना समाजशास्त्रीय, सांस्कृतिक, नैतिक आणि भावनिक स्तरांशी जोडलेला प्रश्न आहे. भारतीय समाजात आजही मृत्युनंतर शरीराशी संबंधित संस्कार, धार्मिक श्रद्धा, आत्म्याबद्दलच्या कल्पना, कर्म-फलाची संकल्पना आणि जन्म-मृत्यूचे तत्वज्ञान यांचा माणसाच्या निर्णयांवर मोठा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे अनेक वेळा अवयवदानाबाबत अज्ञान, गैरसमज, अंधश्रद्धा आणि भावनिक विरोध आढळतो. विशेषतः ग्रामीण भागात आणि कमी सुशिक्षित समाजघटकांमध्ये अवयवदान म्हणजे "शरीर अपूर्ण होणे", "पुनर्जन्मात शरीर अधूरं मिळणे", "शरीरावर अत्याचार" असे चुकीचे अर्थ आजही प्रचलित आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता या भीती, श्रद्धा आणि गैरसमजांच्या आड एक मोठा मानवी प्रश्न दबून राहतो तो प्रश्न म्हणजे "जर माझ्या मृत्यूनंतर माझ्या एका निर्णयामुळे कोणाचे तरी जीवन वाचू शकते, तर तो निर्णय न घेणे योग्य आहे का?"*भारतात अवयव प्रत्यारोपणाची गरज मोठी आहे. सरकारच्या आणि वैद्यकीय संस्थांच्या अहवालानुसार दरवर्षी हजारो रुग्ण अवयवांच्या प्रतीक्षायादीतच मृत्युमुखी पडतात. पण दुसरीकडे दरवर्षी लाखो लोक असे मृत्यूला सामोरे जातात ज्यांच्यातील अवयव दानातून अनेकांचे जीव वाचू शकतात. समाजशास्त्रीय विसंगती अशी की इच्छा असूनही प्रक्रिया, माहिती, नोंदणी आणि जागरूकतेचा अभाव हा अवयवदानाच्या प्रसारात मोठा अडथळा ठरतो. ही परिस्थिती पाहता सामाजिक संस्था, डॉक्टर्स, धोरणकर्ते, माध्यमे आणि नागरिक यांनी मिळून अवयवदानाची संस्कृती निर्माण करणे गरजेचे आहे.अवयवदान ही मूल्याधिष्ठित कृती आहे, त्यामध्ये समता, सहजीवन, मानवी एकात्मता आणि परोपकाराची सर्वोच्च पायरी असते. जेव्हा दाता आणि प्राप्तकर्ता एकमेकांना ओळखत नसतात, धर्म, जात, भाषा किंवा वर्ग फरक नसतो, तेव्हा हा कृतीसमूह मानवी समाजातील सर्वात सुंदर समानतेचा संदेश देतो. अवयवदान ही केवळ एका व्यक्तीची मदत नसून मानवी नात्यांची सीमा मिटवणारी आणि सामाजिक बांधिलकी मजबूत करणारी जोपासना आहे. विशेष म्हणजे एका मृत व्यक्तीच्या अवयवांमुळे काही जीवनं वाचू शकतात आणि काही व्यक्तींना जीवनशक्ती, दृष्टी किंवा कार्यक्षम जीवन मिळू शकते.भारतात कायदेशीर पातळीवर 'Human Organ Transplantation Act' हा कायदा अवयवदानाला वैध मान्यता देतो. हा कायदा अवयवांची देवाणघेवाण, विक्री किंवा शोषण टाळण्यासाठी अस्तित्वात आला. परंतु कायदा पुरेसा नाही, सामाजिक बदल आवश्यक आहे. कुटुंबातील चर्चा, शाळांमधील मूल्यशिक्षण, धार्मिक आणि सामाजिक नेत्यांचे मार्गदर्शन, रुग्णालयांची तयारी, मेंदूमृत्यूची (Brain Death) संकल्पना समजावणे आणि डिजिटल अवयवदान नोंदणी या प्रक्रिया जनजागृतीचा महत्त्वाचा भाग ठरतात. आजही अनेक कुटुंबे भावनिक वेदनेत निर्णय घेऊ शकत नाहीत, कारण अवयवदानाची कल्पना त्यांना मृत्यूला वेगळ्या नजरेने पाहायला लावते. पण समाजशास्त्रीय अर्थाने पाहता अवयवदान मृत्यूचे अर्थनिर्माण करते, मृत्यूला निरर्थक न ठेवता जीवनाचा विस्तार बनवते.अवयवदान ही सामाजिक जबाबदारी आहे. जर प्रत्येक व्यक्ती अत्यावश्यक ओळखपत्रांमध्ये जसे PAN, Aadhaar, Driving License तसेच Organ Donor Consent जोडून ठेवला तर भारत अवयवदानात पुढे येईल. तरुण पिढीत जागरूकता वाढत आहे, परंतु वृद्ध आणि ग्रामीण समाजघटकांमध्ये माहितीचा अभाव अजूनही आहे. माध्यमांची भूमिका येथे खूप मोठी आहे. मृत्यूचा भीतीदायक चेहरा न दाखवता नवीन जन्मासारखी जीवनदानाची प्रतिमा समाजात पसरवणे आवश्यक आहे.अवयवदान म्हणजे फक्त एक कृती नाही, ती एक वारसा आहे. एक पिढीकडून दुसऱ्या पिढीला मानवतेची साथ तेणे आवश्यक आहे. 27 नोव्हेंबरचा हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की डॉक्टर, विज्ञान किंवा तंत्रज्ञान एकट्याने जीव वाचवू शकत नाही. तर त्यासोबतच त्या साखळीत सर्वात महत्त्वाची कडी म्हणजे "आपण" आणि आपला निर्णय होय.जेव्हा शरीर भस्म होते, जमिनीत विलीन होते किंवा समुद्रात सोडले जाते तेव्हा काही शिल्लक राहत नाही. परंतु अवयवदान केले तर आपले हृदय कोणाच्यातरी शरीरात धडधडत राहते, डोळे कोणालातरी नवीन जग दाखवतात, फुफ्फुसे कोणाला स्वच्छ जीवन देतात आणि मूत्रपिंड कोणाला नवसंजीवनी देते. हे फक्त शरीरदान नाही, तर हे जीवनाचा विस्तार आहे, अस्तित्वाचा नवीनर्जन्म आहे.आज 27 नोव्हेबर रोजी अवयव दान दिनानिमित्त एकच संदेश देता येईल की "मृत्यू अनिवार्य आहे, पण अवयवदान हे अमरत्वाचे दार आहे." चलो, जागृत व्हा, नोंदणी करा आणि मानवतेच्या या अद्वितीय परंपरेचा भाग बनूया. अवयव दान करून दुसऱ्यांना जीवन द्या, कारण मृत्यूनंतरसुद्धा आपण कोणाच्यातरी श्वासांत जिवंत राहू शकतो.




**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

मो. 9960103582

bagate.rajendra५@gmail.com


## सर्व भारतीयांसाठी संविधान हाच सर्वोच्च पवित्र धर्मग्रंथ - प्रा. डॉ. आसीया चिश्ती

**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण वरिष्ठ महाविद्यालयातील सभागृहात राष्ट्रीय सेवा योजना ,सांस्कृतिक विभाग आणि राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित "संविधान दिनाच्या " निमित्ताने प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. त्या मराठी साहित्याच्या अभ्यासिका असून मराठी विभागप्रमुख आहेत.कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी श्रीकृष्ण वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून आदर्श महाविद्यालयाचे भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. भास्कर शिंदे हे होते.त्या पुढे म्हणाल्या की, " आपण सगळे भारतीय आहोत. भारत हे आपले घर आहे. आपण इथे राहतो. काम करतो. खेळतो आणि इथेच घडतो. आपल्या स्वप्नांना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. आपण सर्व भारतीय एका कुटुंबासारखे आहोत. आपण एकमेकांवर अवलंबून आहोत. आपल्याला एकमेकांची काळजी घेतली पाहिजे. आपल्या देशाला कोणत्या दिशेने नेले पाहिजे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. भारतीय संविधान हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे आणि त्याचा आदर आपण राखलाच पाहिजे. हाच विचार अनेक समाजसुधारकांनी आपल्या मातीत रुजवला. याच मूल्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकर , मौलाना आझाद, पंडित नेहरू , भगतसिंग , महात्मा गांधी, आणि इतर अनेक नेत्यांच्या नेतृत्वाखालील आपल्या स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही असलेले संविधान प्रदान केले. भारतीय संविधान हाच खरा राष्ट्राचा सर्वोच्च धर्मग्रंथ असून भारतीय संविधान प्रत्येक धर्माच्या तत्त्वानुसार प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा आणि आचरण करण्याचा अधिकार प्रदान करते. देश कसा चालवायचा आहे हे आपल्याला मिळून ठरवता येते. कोणताही राजा, धर्मग्रंथ, किंवा परदेशी शासक इथे नाही. आपल्या देशातील निर्णय आपणच घेतो. आपण आणि या देशातील सर्वसामान्य माणूस या देशाचा मालक आहे. देशाची जल, जमीन आणि जंगल यावर प्रत्येक भारतीयाचा समान अधिकार आहे. देशाची संपत्ती मूठभर लोकांच्या हातात केंद्रित होऊ नये याची पुरेपूर काळजी भारतीय संविधान घेते. ती सर्वांच्या कल्याणासाठी वापरली पाहिजे. विशेषतः गोर गरिबांसाठी आणि समाजातील दुर्बल घटकासाठी उपयोगात आणली पाहिजे. व्यक्तीला वैयक्तिक धर्म असू शकतो पण देशाला कुठलाही धर्म नाही. प्रत्येक भारतीयाला पसंतीचा धर्म स्वीकारण्याची किंवा न स्वीकारण्याचे स्वातंत्र्य ही राज्यघटना देते. सरकार कोणतेही असो ते सर्व धर्मांना समान व न्याय वागणूक दिली पाहिजे. एक व्यक्ती एक मत , एक मत समान पत या तत्त्वानुसार सर्व निर्णय घेतले जातात. लोक आपले प्रतिनिधी निवडतात . जे त्यांच्यावतीने निर्णय घेतात. भारत हा जगातील पहिला देश आहे ज्याने संविधान लागू झाल्याबरोबर महिलांसह सर्व प्रौढ नागरिकांना न मागता मतदानाचा हक्क दिला. अनेक राष्ट्रात महिलाना त्यांच्या हक्क आणि अधिकारासाठी संघर्ष करावा लागलेला आहे, हा इतिहास आपल्या समोर आहे. त्यामुळे भारतातील प्रत्येक नागरिकास विशेषतः तरुण विद्यार्थ्यांना संविधान माहीत असणे ते ज्ञात करून घेणे गरजेचे आहे. आपण सारे भाग्यवान आहोत की इतके चांगले संविधान आपल्याला लाभले आहे. " संविधान दिनाचे सूत्रसंचालन प्रा डॉ.भाऊसाहेब उगले यांनी केले तर कार्यक्रमाचे सविस्तर असे प्रास्ताविक राज्यशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. राजाराम निगडे यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. बालाजी कोनाळे यांनी मांडले. भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे सामूहिक वाचनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ नोव्हेंबर २०२५


## मुळा

जमिनीत वाढणारा
मी आहे मुळा
चव माझी उग्र
पण स्वभावाने भोळा

निसर्गाने दिला मला
गोरा गोरा रंग
लांबच लांब
गुळगुळीत अंग

जेव्हा बसते
जेवणाची पंगत
मी तोंडी लावतांना
न्यारीच असते रंगात

कांदा माझा मित्र
आमची अतूट जोडी
ताटाची शोभा वाढविते
आमच्या गोल गोल फोडी

जेवतांना मोठी मंडळी
टाकतात मळा खाऊन
मुलं नाक मुरडतात
ताटात मला पाहून




**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## दिस बदलले आता

दिस बदलले आता
जातं थांबलं गं बाई
मुक्या मुक्या भावनांचं
नातं हरवलं बाई

तुझ्या वेदनेचे शब्द
रानभर दाटलेले
संसाराच्या चक्रामध्ये
आभाळ गं फाटलेले

माहेरच्या अंगणात
बालपण रुजलेलं
जगण्याच्या जाचामध्ये
वय सारं पोळलेलं

चुलीतल्या राखेवर
गाणं हिर्व कोरलेलं
स्वप्न मोरपिसी गोड
ओंजळीत वाढलेलं


**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड
मो.9403384889


# राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सर्व उमेदवारांना निवडून द्या - अजित दादा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** नगर परिषद जिंतूर निवडणूक २०२५ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून नगराध्यक्ष पदासाठी साबिया बेगम कपिल फारुकी व सर्व अधिकृत उमेदवार यांच्या प्रचारासाठी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री अजितदादा पवार साहेब यांची दादा शरीफ चौक जिंतूर येथे जाहीर सभा संपन्न झाली. यावेळी अजित दादा यांनी माझे मित्र कफील फारुकी यांची आठवण येत असल्याची खंत व्यक्त करत भाषणास सुरवात केली, २०१६ मध्ये नगर परिषद जिंतूर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडे आली होती तेंव्हा आम्ही विविध योजनेतून भर घोष निधी देत पाठीमागचा बॅकलॉग भरून काढण्याचा प्रयत्न केला व यापुढे देखील जिंतूर शहरासाठी शादीखाना, मंगल कार्यालय, रस्ते, नाल्या ई. भरघोष निधी देण्याचा शब्द दिला. तसेच मा.आ.विजयराव भांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना २०१६ दादांच्या सूचनेनुसार काफिलभाई फारोकी यांना उमेदवारी दिली व विजय मिळवला. कफील भाई म्हणजे जिंतूर मध्ये प्रथम गणपती फेस्टिवल करणारे व्यक्ती होते. त्यांचा कोरोना काळातील निधना नंतर त्यांच्या पत्नी साबिया भाबी यांना उमेदवारी (बाळासाहेब भांबळे यांना स्टेजवर जवळ बोलवून) मागच्या वेळी उपनगराध्यक्ष, प्रसिद्ध उद्योजक असतांना मुस्लीम समाजाला प्रतिनिधित्व देण्यासाठी माझ्या भावाने एका शब्दावर माघार घेतली त्याबद्दल बाळू तुझे कौतुक करतो तसेच तुझ्या त्यागा नक्कीच वाया जावू देणार नाही असे उद्गार काढले. मागील आपल्या नगरपालिकेच्या काळात कफील भाई अध्यक्ष असतांना शिवरायांचा अश्वारूढ पुतळा 15 मंदिराचे सभामंडप व सुशोभीकरण केले. मागासवर्गीय समाजासाठी जिल्ह्यातील सर्वात सुंदर बुद्धविहार, अण्णा भाऊ साठे पुतळा, येलदरी पाणीपुरवठा योजना यशस्वी केली. तसेच या कार्यक्रम प्रसंगी सुरेश भैया नागरे यांनी देखील मनोगत व्यक्त करत माझी व भांबळे साहेबांची युती हि फक्त विकासाचा मुद्द्यावर झाली असून आम्ही एकच आहोत परत एकदा नगर परिषद मध्ये आम्हास काम करण्याची संधी द्या अशी विंनती केली.तर नगराध्यक पदाच्या उमेदवार साबिया बेगम कफील फारुकी यांनी मनोगत व्यक्त करत मला मागील नगराध्यक्ष पदाचा राजकीय अनुभव व प्रशासन चालवण्याचा दीर्घ अनुभव आहे विरोधकांचे जेवढे वय आहे तेवढा माझा राजकीय अनुभव आहे असा टोला लगावला. प्रेक्षा ताई भांबळे यांनी प्रास्ताविक करताना नक्कीच हि निवडणुक एका प्रामाणिक, इमानदार कार्यकर्त्याला न्याय देण्याची आहे. ज्यांनी नेहमीच हिंदू मुस्लिम एकता कायम ठेवली आपल्या सगळ्यांच्या सुख दुःखात नेहमी शामील झाले. अशा कफील फारुकी यांना श्रद्धांजली म्हणून यावेळचे मतदान आहे असी भावनिक साद दिली. यावेळी मा.ना.श्री अजित दादा पवार साहेब, आमदार राजेश दादा विटेकर , मा.आ.विजयराव भांबळे, मा.सुरेशभैय्या नागरे, अमृताताई नागरे, प्रेक्षाताई भांबळे, साबिया बेगम कपिल फारुकी, तालुकाध्यक्ष लक्ष्मण बुधवंत, विश्वनाथ राठोड, अजयराव चौधरी, मुरलीधर मते, विठ्ठल घोगरे, केशवराव बुधवंत, हाजी सलीम भाई, आसेफ काझी साहेब, कदीर मिर्झा साहेब, बाळासाहेब भांबळे, करीम लाला, अमन पहेलवान, गणी कुरेशी, शोकत लाला, सलीम सर, खयुम कादरी, हकीम लाला, नागेश पुणेकर, यासीन पठाण, शाहेद बेग मिर्झा, मनोहर डोईफोडे, पृथ्वीराज भांबळे, गजानन रोकडे, दत्तराव काळे, कटारे अरविंद, दलमीर पठाण, रामराव उबाळे, जाबेर सय्यद, अशोक बंड, दीपक शेंद्रे, रवी नागरे, अरुण घुगे, आहेमद बागबान, सुलेमान सिद्धिकी, यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# मौलाना आझाद आणि पं . नेहरू यांनी आधुनिक शिक्षणाची पायाभरणी केली - प्राचार्य डॉ. आर. व्ही. मस्के




**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय शिक्षण दिन व बालदिन नुकताच साजरा करण्यात आला. यावेळी अबुल कलाम मौलाना आझाद व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावरील भित्तिपत्रकाचे विमोचन करण्यात आले. आजीवन शिक्षण विस्तार विभाग आयोजित राष्ट्रीय शिक्षण दिन व बालदिनाचा एकत्रित कार्यक्रम घेण्यात आला . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा नवनाथ गोरे यांनी केले . उपप्राचार्य प्रा.एन.एम. करडे यांनी यांनी मौलाना अबूल कलाम आझाद यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला. या वेळी राशी पंडित व प्राची काळे या विद्यार्थिनीनी पंडित जवाहरलाल नेहरु व मौलाना आझाद यांच्या राष्ट्रीय शिक्षण दिन व बालदिना निमित्त भित्तिपत्रक काढले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.व्ही. मस्के यांनी दोन्ही महामानवांनी भारतीय शिक्षणाचा विशेषत: आधुनिक शिक्षणाचा पाया घातल्याचे स्पष्ट केले , देशातील विद्यापीठे , विद्यापीठ अनुदान आयोग, आय आय टी अशा उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था मौलाना आझाद व पंडित नेहरू यांच्या मार्गदर्शनातच पुढे आल्याचे स्पष्ट केले. यावेळी प्राध्यापक , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103